## प्रकरण - १९.१
## पोलीस गृहनिर्माण

**१९.अ.१** पोलीस मनुष्यबळ यास आवश्यक प्रोत्साहन तथा सोईसुविधा जसे वाहन, घर, वैदयकिय सुविधा, विमा इ. प्रकारच्या सोईसुविधा उपलब्ध करुन देवून या मनुष्यबळाकडून गुन्हयांचा नायनाट करणे शक्य होणार आहे. यासाठी विविध पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना आवश्यक मुलभूत गरजेची साधने म्हणजेच निवासासाठी घरे / वाहने उपलब्ध करुन देण्याचा प्रकल्प १९७४ पासून हाती घेतला आहे. राज्यातील कार्यरत पोलीसबळ व त्यांच्यासाठी उपलब्ध असलेली घरे याची संवर्गनिहाय माहिती मा. पोमसं कार्यालय, मुंबई येथील कार्यासन क्र. २७ (ब) / २८ (ब -२) यांचेकडून उपलब्ध करुन घेवन या प्रकरणामध्ये समावेश केला आहे.

**१९.अ.२ पोलीसांसाठी निवासी घरे :**
बीपीआरडी च्या माहितीनूसार दि. ०१-०१-२०१२ प्रमाणे पोलीस निवासी घरांची राष्ट्रीय समाधान पातळी (National Satisfaction Level) ३२.९२% टक्के असून महाराष्ट्र राज्याची समाधन पातळी ४५.७५% आहे. राज्यातील पोलीस निवासस्थानाची समाधान पातळी राष्ट्रीय समाधान पातळीपेक्षा जास्त असली तरी सुक्ष्म विश्लेषण:अंती खालील बाबी लक्षात येतात.
नवीन प्रमाणकांनुसार २४.२९% घरे उपलब्ध आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने जुनी परंतु प्रशस्त घरे ब-याच घटकांच्या ठिकाणी आहेत. बहुमजली इमारती २२० चौ. फु. चटई क्षेत्र असलेली ३१.६७% घरे आहेत. एकमजली जुन्या बैठया चाळीच्या इमारती १८० - २२० चौ. फु. चटई क्षेत्र असलेली ४३.५५% घरे आहेत. यातील बहुतांशी घरे संडास व्यवस्थेशिवाय आहेत. पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक या दर्जाच्या अधिका-याच्या निवासस्थानांची समाधान पातळी २९.४% आहे. महाराष्ट्र पोलीस दल हे देशातील सर्वात मोठे पोलीस दल आहे. महाराष्ट्र पोलीस यांचेसाठी निवासस्थानाची सध्यस्थिती खालील तक्ता क्र. १९.१.१ मध्ये दिलेली आहे.

## CHAPTER - 19.1
## POLICE HOUSING

**19.A.1** Police manpower alone is not sufficient to curb the crime unless the personnel are motivated and facilitated with basic necessities such as equipment, transport, housing, medical insurance, etc. Therefore, a project has been started for availability of housing facility to various categories of police officials, availability of vehicles and sophisticated gadgets with the police, etc. in the year 1974. Information on the availability of police housing facility against the sanctioned police force for different categories is made available from desk No. 27(B) /28(B-2) D.G.P. Office, Mumbai

**19.A.2 Residential Accomodation for Police :**
According to the information of BPRD Dated 01-01-2012 the satisfaction level of police residential accomodation at National Level was 32.92% and for Maharashtra State it is 45.75%. Though, it is observed that Satisfaction Level in Maharashtra State is higher than National Level, while micro analysis some of the following obervations are to be noted :
As per new Satisfation Level Index, 24.29% houses are available which includes old but spacious houses at some of the units. 31.67% houses of 220 Sq. Ft. carpet area are available in Multi storage buildings. 43.55% houses of 180 - 220 Sq. Ft. carpet are available in single storage buildings without latrin facility. Satisfaction level of houses for PSI / PI is 29.4%. Maharashtra Police Manpower is the largest police force in the Country. The current status of Maharashtra Police housing is presented in the following Table 19.1.1.

### Table 19.1.1
### THE DETAILS OF AREA OF RESIDENTIAL ACCOMODATION APPLICABLE TO MAHARASHTRA POLICE (RANKWISE)

| Designation | Area in Square Feet |
|---|---|
| 1. Police Constable | 409.032 |
| 2. Police Naik to Police sub Inspector | 473.61 |
| 3. Asst. Police Inspector to Police Inspector | 538.2 |
| 4. Dy. S.P. to Dy. Commissoner of Police | 828.82 |
| 5. Selection Grade Superintendent of Police | 1237.86 |
| 6. Superintendent of Police / Commandant, Head of Unit | 1506.96 |
| 7. D.I.G.P. | 1506.96 |
| 8. Spl.I.G.P. to D.G.P. | 1937.52 |

Source -: O.W.NO.DGP/44/12013/PLANNING RESEIDENTIAL- NON-RESIDENTIAL BUILDINGS /14/13, MUMBAI, DTD. 15/02/2014

**As per Maharashtra Govt. Home Dept. G.R.No. RSA-0609/ NO. 432/POL-7/ Dtd.17/11/2009 Maharashtra Govt. had decided to provide 80% accomodation to all Police Officer & Men**

### Table 19.1.2

| Sr. No. | Rank | Sanctioned Strength | Number of Available Residential Accomodation | To achieve 80% Satisfaction Level requirement of Residential Accomodation |
|---|---|---|---|---|
| 1 | ASI & Above | 24531 | 7769 | 11855 |
| 2 | Pc to HC & Class IV -Subordinate Staff | 2,34,623 | 99997 | 87701 |
| Total | | 2,59,154 | 107766 | 99556 |

Note - * Sanctioned strength does not include class IV Subordinates staff

** Accomodation includes class IV subordinate staff

**१९.अ.३** वरील तक्ता क्र .१९.१.२ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील मंजूर व कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविली आहे. एकुण मंजूर २५९१५४ मनुष्यबळापैकी १०७७६६ (४१.५८%) मनुष्यबळासाठी शासनाने निवासी घरांची उपलब्धता केली आहे. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना उपलब्ध करुन दिलेल्या १०७७६६ निवासी घरापैकी ७७६९ (७.२१%) घरे ही अधिका-यासाठी (सहा. उपनिरीक्ष व वरील ) तथा उर्वरित ९९९९७ (९२.७९%) घरे पोलीस कर्मचा-यांसाठी (पोलीस हवालदार, पोलीस नाईक, पोलीस शिपाई व चतुर्थ श्रेणी कर्मचारी ) उपलब्ध आहेत. गृहविभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय दि. १७-११-२००९ नुसार किमान ८०% समाधान पातळी चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ९९५५६ नवीन घरांची निर्मीती करावी लागेल. यापैकी ११८५५ नवीन घरांची निर्मीती ही अधिका-यासाठी तर ८७७०१ नवीन घ्ररांची निर्मीती ही पोलीस कर्मचा-यांसाठी करावी लागेल.

**19.A.3** Out of the total sanctioned strength of 259154, the Govt. has provided 107766 (41.58%) residential accomodations. Out of 107766 residential accomodation provided by Govt. 7769 (7.21%) residential accomodation are provided to officers (ASI & Above) and 99,997 (92.79%) to subordinates (Constables, Head constables & Class IV Subordinate Staff). To achieve target of 80% satisfaction level of residential accomodation total requirement of accomodation is 99,556. Out of the requirement 99,556 (To achieve 80% Satisfaction Level requirement) residential accomodation required for officers (ASI & above) is 11855 and that of subordinates (Constables, Head constables & Class IV Subordinate Staff) is 87701.